### कलम ४ ( 1 ) ( ख ) ( vii )

### पिंपरी चिंचवड मनपा येथील कै.हृ.भ.प.प्रभाकर मल्हारराव कुटे,स्मृती रुग्णालय आकुर्डी रुग्णालय मध्ये दस्ताऐवजांची वर्गवारी

| अ.क्र . | सल्ला मसलतीचा विषय | कार्यप्रणालीचे विस्तृत वर्णन | कोणत्या अधिनियम / नियम / परिपत्रकाद्वारे | पुनरावृत्ती काल |
|---|---|---|---|---|
| 1 | समस्या निवारण | कै.हृ.भ.प.प्रभाकर मल्हारराव कुटे,स्मृती रुग्णालय आकुर्डी रुग्णालयात नागरीकांना रुग्णसेवेबाबत सुचना व तक्रारी यासाठी सुचना / तक्रारपेटी ठेवण्यात आली आहे . प्राप्त झालेल्या सुचनेनुसार आवश्यक कार्यवाही करणे व सारथी सकेत स्थळावर व प्राप्त झालेल्या तक्राराची योग्य ती दखल घेण्यात येती व पुर्तता करण्यात येते | शासनाने जाहीर केलेल्या लोकशाही दिन या धर्तीवर मा . आयुक्त याच्या आदेशानुसार / नागरीकांची सनद महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमतील तरतुदीनुसार | |
| 2 | माहिती अधिकार २००५ | केंद्र शासनाने जाहिर केलेल्या कायदानुसार ज्या नागरीकांना / संस्थेला कोणासही माहिती दयावयाची असले तर विहित नमुन्यातील अर्ज व त्यावर र.रु .१० / कोर्ट फी स्टॅम्प लावुन आवश्यक ती माहिती मागविता येते असा अर्ज प्राप्त झाल्यावर तो संबंधीत लिपीक कर्मचा-याकडे ठराविक कालावधी देऊन कार्यवाहीसाठी दिला जातो . पुर्ण कार्यवाही झाल्यावर या विभागाकडे प्राप्त झालेली माहिती योग्य आहे अथवा नाही याची खातर जमा माहिती अधिकारी करुन संबंधीत अर्जदाराला देण्यात येते या उपरही ज्या अर्जदारास माहितीबाबत साशंकता निर्माण झालेली असुन तो अर्जदार अपीलिय अधिका - याकडे र.रु .२० / - कोर्ट फी स्टॅम्प लावुन पुन्हा अपिल करु शकतो . अश्या पसंगी अपिलीय अधिकारी सुनावणी घेऊन त्यावर | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | निर्णय देतात . | | |
| 3 . | राष्ट्रीय आरोग्य कार्यकम | कै.ह.भ.प.प्रभाकर मल्हारराव कुटे,स्मृती रुग्णालय आकुर्डी रुग्णालयातील राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमाचे उदिष्टे वैद्यकीय मुख्य कार्यालयातील मा . वैद्यकीय सचालक तथा अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी याच्याकडुन दिली जातात . अमंलबजावणी कै.ह.भ.प.प्रभाकर मल्हारराव कुटे,स्मृती रुग्णालय आकुर्डी रुग्णालयातील जेष्ठ वैद्यकीय अधिकारी व कुटुंब कल्याण विभागातील कर्मचारी कामकाज करतात . काही बाबी मध्ये समाज प्रबोधानाची अत्यंत आवश्यकता असते व उदीष्टे पुर्ततेसाठी त्याचा फायदा मिळतो उदा . जननी सुरक्षा योजना , प्रसवपूर्व गर्भलिंग तपासणी ( PCPNDT Act ) याबाबत पथनाटय , माहिती पत्रिका झोपडपटटयामध्ये साथीचे रोग आटोक्यात आणण्यात ( H1N1,चिकून गुन्या ) उदा .डेंग्यू ,हिवताप, मलेरिया जनतेला प्रबोधन देण्यात येऊन कोरडा दिवस पाळण्याचा आवाहन कुटुब कल्याण विभागातील कर्मचाऱ्याकडुन केले जाते . | | |
| 4 | धन्वंतरी स्वास्थ्य योजना २०१३ | पिंपरी चिंचवड मनपा आस्थापनेवरील कायम स्वरुपी कार्यरत असणा - या कर्मचा - यांना व त्यांच्या कुटुंबीयाना ( पती , पत्नी व २५ वर्ष पर्यतची २ . आपत्ये ) वैद्यकीय \| सुविधा पुरविल्या जातात तसेच सेवानिवृत्त कर्मचा यांनाही या सुविधेचा लाभ दिला जातो . | | |